# मिरा भाईंदर महानगरपालिका

**MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION**

कार्यालय: स्व.इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), जि.ठाणे-401101.

दूरध्वनी : 022-28192828 / 28193028 / 28181183 / 28181353 / 28145985

ईमेल : mbmcho@gmail.com वेबसाईट : www.mbmc.gov.in

मुख्य कार्यालय


जा.क्र. : मिभा/मनपा/२३८४/२०२१

दिनांक : २०/१०/२०२१

**वाचा** — १) आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५.

२) शासन अधिसूचना, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई, क्र. कोरोना२०२०/ प्र.क्र. ५८/ आरोग्य ५, दि. १४/०३/२०२०.

## // आदेश //

## विषय- १८ वर्षांवरील नागरिकांचे कोविड लसीकरण करणेबाबत...

ज्याअर्थी, कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगास (COVID-१९) प्रतिबंध व नियंत्रण करण्यासाठी जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, ठाणे जिल्हयात आपत्ती व्यवस्थापन कायदा लागू झाल्याचे घोषित केले आहे,

आणि, ज्याअर्थी, साथरोग प्रतिबंधात्मक अधिनियम, १८९७ च्या खंड २,३ व ४ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगास (COVID-१९) प्रतिबंध व नियंत्रण करण्यासाठी अधिसूचना क्र. कोरोना २०२०/ प्र.क्र.५८/ आरोग्य५, दि. १४ मार्च २०२० ची अंमलबजावणी सुरु झालेली आहे,

आणि, ज्याअर्थी सदर अधिसूचनेच्या नियम ३ अन्वये आयुक्त महानगरपालिका हे "सक्षम प्राधिकारी" म्हणून घोषित केले आहे,

आणि ज्याअर्थी, महानगरपालिका कार्यक्षेत्रात COVID-१९ आजारावर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे, त्या करण्यासाठी महानगरपालिका आयुक्त हे "सक्षम प्राधिकारी" म्हणून काम पाहतील,

आणि, ज्याअर्थी, कोविड-१९ आजाराचा प्रादुर्भाव रोखणेसाठी शासनाने विविध उपाययोजनासाठी वेळोवेळी आदेश/ सुचना निर्गमित केल्या आहेत. यामध्ये १८ वर्षावरील नागरीकांचे कोविड लसीकरण होणे अत्यंत महत्वाचे आहे. आणि

त्याअर्थी, तिसऱ्या लाटेचा संभाव्य धोका लक्षात घेता १८ वर्षावरील नागरीकांनी तातडीने आपले कोविड लसीकरण करून घेणे अत्यंत गरजेचे आहे. कोविड लसीकरण पुर्ण झालेल्या व्यक्तीला कोविडचा आजार झाल्यास अशा व्यक्तींमध्ये शक्यतो आजाराची तीव्रता कमी असल्याचे दिसते. जेणेकरुण ज्या व्यक्तींनी, लसीचे दोन्ही डोस घेतलेले आहेत त्यांचा कोविड पासून बचाव होऊ शकतो. उपरोक्त बाबींचा विचार करता, ज्या व्यक्तींचे १८ वर्षपूर्ण झालेले असतील अशा सर्व व्यक्तींनी कोविड लसीकरण करणे आवश्यक आहे.

सबब, खालील ठिकाणी येणाऱ्या १८ वर्षावरील नागरीकांचे कोविड लसीकरण प्रमाणपत्र असल्याची खात्रीकरूनच प्रवेश देण्यात यावा अन्यथा प्रवेश/सेवा देण्यात येऊ नये.

१. सर्व हॉटेल्स, रेस्टॉरंट व बार

२. सर्व मॉल्स, शोरुम, दुकाने व आस्थापना.

३. सर्व खाजगी दवाखाने, रुग्णालये, मेडिकल स्टोअर्स.

४.सर्व बँका, विविध खाजगी व शासकीय कार्यालये

५. सर्व महाविद्यालयातील कर्मचारी,पालक वर्ग व विद्यार्थी.

६. सर्व शाळांतील कर्मचारी व पालक वर्ग.

७. सर्व रेशन दुकाने, पेट्रोल पंप, गॅस सिलेंडर वितरण केंद्रे.

उपरोक्त आस्थापनांनी सदर आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करावी. सदरहू आदेशाची अंमलबजावणी करण्यास संबंधितांनी टाळाटाळ केल्यास अथवा विरोध दर्शविल्यास संबंधितांचे विरुध्द आपत्ती व्यवस्थापन अधिनियम-२००५ मधील ५१ (b), भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम १८९७ व भारतीय दंड संहिता (४५ ऑफ १८६०) च्या कलम १८८ नुसार दंडनीय / कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

(दिलीप ढोले)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति,

१. सर्व हॉटेल्स, रेस्टॉरंट व बार

२. सर्व मॉल्स, शोरुम, दुकाने व आस्थापना.

३. सर्व खाजगी दवाखाने, रुग्णालये, मेडिकल स्टोअर्स.

४.सर्व बँका, विविध खाजगी व शासकीय कार्यालये

५. सर्व महाविद्यालयातील कर्मचारी,पालक वर्ग व विद्यार्थी.

६. सर्व शाळांतील कर्मचारी व पालक वर्ग.

७. सर्व रेशन दुकाने, पेट्रोल पंप, गॅस सिलेंडर वितरण केंद्रे.